**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुद्दुचेरी इथं दोन हजार सातशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण

- इराणवर इस्राएल आणि अमेरिकेच्या हल्ल्यानंतर पश्चिम आशिया क्षेत्रात संघर्ष पेटला/ जगभरात पडसाद

- पश्चिम आशियातल्या भारतीयांसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना जारी

- नागपूर जिल्ह्यात एका कारखान्यातल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू, तर अन्य १८ जण जखमी

**आणि**

- टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना वेस्ट इंडीजबरोबर

**<><><><><>**

पुद्दुचेरी इथं दोन हजार सातशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. राज्यातल्या आणि केंद्रातल्या डबल इंजिन सरकारने मिळून काम केल्यामुळे इथला विकास वेगाने झाला असून या प्रकल्पांमुळे पुद्दुचेरीच्या लोकांच्या जीवनात परिवर्तन घडेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला. विकासकामांच्या उद्घाटनानंतर आयोजित सभेला ते संबोधित करत होते. गेल्या चार वर्षांत विकास आणि उत्तम प्रशासनाचा अनुभव पुद्दुचेरी घेत आहे, शाळा, रुग्णालय, रस्ते अशा पायाभूत सुविधांना सरकारने प्राधान्य दिल्याने लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी** - -

यावेळी प्रधानमंत्र्यांनी पुद्दुचेरीत झालेल्या विविध विकासकामांचा आढावा आपल्या भाषणात घेतला.

प्रधानमंत्र्यांनी पुद्दुचेरीत पायाभूत सुविधा, नागरी सेवा, उद्योग, शिक्षण, आरोग्य संदर्भातल्या विविध १९ प्रकल्पांचंही उद्घाटन केलं. यात ई बस, कमांड अँड कंट्रोल सेंटर,

आर्थिक दुर्बल घटकांसाठी घर आणि पाणीपुरवठा योजनेचा समावेश आहे. पुद्दुचेरीमधल्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराला चालना देण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी दीड हजार कोटींच्या ७४ प्रकल्पांची पायाभरणी केली. यात ग्रामीण भागातले रस्ते, पाणीपुरवठा योजना आदींचा समावेश आहे.

तमिळनाडू इथं चार हजार चारशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज करणार आहेत.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात इराणचे नेते अयातुल्ला अली खामेनी ठार झाल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केलं आहे. खामेनी यांच्या निधनानं इराणच्या जनतेला आपला देश परत मिळवण्याची संधी दिली आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. इराणमधले बॉम्ब हल्ले आणखी आठवडाभर किंवा त्यापुढे काही काळ सुरू राहतील असं त्यांनी म्हटलं आहे.

इराणच्या लष्करी आणि सरकारी आस्थापनांवर अमेरिका आणि इस्त्राएलनं केलेल्या संयुक्त हवाई हल्ल्यात काल खामेनी यांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं आज दुजोरा दिला. या हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख आणि संरक्षण मंत्री देखील ठार झाल्याचं वृत्त आहे. या हल्ल्यात इराणचे ४० पेक्षा जास्त सरकारी अधिकारी देखील मारले गेले, किमान २०१ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ७०० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले. अमेरिका आणि इस्त्राएलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी इराणनं संपूर्ण मध्यपूर्वेत हल्ले सुरु केले आहेत. दुबई, दोहा, बहरीन आणि कुवेत मध्ये अमेरिकेचे लष्करी तळ असलेल्या किंवा अमेरिकेशी संबंधित ठिकाणी इराणने हल्ले केल्याचं वृत्त आहे.

इराण आपल्या स्वसंरक्षणासाठी निर्णायकपणे कारवाई करत राहील, असं इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद आणि संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

तर, इराणनं आपले नेते अयातुल्ला खमेनी यांच्या हत्येचा बदला घेण्याची प्रतिज्ञा केल्याच्या पार्श्वभूमीवर, इराणवरचे हल्ले आणखी तीव्र केले जातील, असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधल्या युद्धाच्या तणावामुळे दुबई विमानतळावरची उड्डाणं अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आली आहेत. या विमानतळाबाहेर काही तासांपूर्वी स्फोट झाला होता. या वेळी दुबई विमानतळावर अडकलेली भारताची बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू हिला सुरक्षित स्थानी हलवण्यात आलं आहे. इंग्लंड इथे स्पर्धेसाठी जाणाऱ्या सिंधुला परिस्थिती बिघडल्यामुळे दुबईत थांबावं लागलं.

<><><><>

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतेनियो गुटेरस यांनी या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला असून दोन्ही पक्षांनी ताबडतोब शस्त्र खाली ठेवून वाटाघाटी सुरु कराव्या असं आवाहन केलं आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या तातडीन बोलावलेल्या बैठकीला ते संबोधित करत होते.

अमेरिकेची कारवाई कायदेशीर होती असं अमेरिकेचे संयुक्त राष्ट्रातले राजदूत माईक वॉल्ट्झ यांनी बैठकीत सांगितलं. इसराएलच्या प्रतिनिधींनी देखील इराणकडून मोठ्या हल्ल्याची शक्यता होती असं सांगत या कारवाईचं समर्थन केलं.

इराणच्या प्रतिनिधींनी सांगितलं की हा हल्ला मानवतेविरुद्धचा गुन्हा असून इराणमधे नरसंहार झाला आहे.

<><><><>

जगभरात या संघर्षाचे पडसाद उमटत आहेत. चीनने या घडामोडींबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली असून तात्काळ युद्ध थांबवण्याचं आवाहन केलं आहे. अमेरिकेच्या माजी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी या हल्ल्यांवर तीव्र टीका केली आहे. हा हल्ला असमर्थनीय असून अमेरिकन जनतेला नको असताना युद्धात खेचल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अशा प्रकारच्या लष्करी कारवाईपूर्वी राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांनी संविधानानुसार अमेरिकेच्या संसदेकडून संमती घेणं आवश्यक होतं असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

अमेरिका आणि इस्राएलने इराणवर केलेल्या हल्ल्याचा देशात अनेक ठिकाणी निषेध करण्यात येत आहे. खमेनींच्या राजवटीला आपला पाठिंबा नाही परंतु कालचा हल्ला विनाकारण आणि संहारक ठरला असून केंद्रसरकारने या परिसरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन कॉंग्रेस प्रवक्ता शमा मोहम्मद यांनी केलं आहे. देशाच्या विविध भागात खमेनींच्या हत्येचा निषेध शिया मुस्लिम समुदायातर्फे करण्यात येत

आहे. काश्मीरच्या विविध  भागात निदर्शनं होत असून मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला यांनी शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियात पेटलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने तिथल्या भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय दूतावास रात्रंदिवस मदतीसाठी उपलब्ध असतील असं त्यात म्हटलं आहे. वेगवेगळ्या देशातल्या दूतावासांनी हेल्पलाईन क्रमांकही जारी केले आहेत. तेल अवीव, अबुधाबी, रियाध, दोहा, दमास्कस, जॉर्डन, बहारिन,कुवैत,आणि बगदाद इथल्यादूतावासांमधे मदत उपलब्ध असल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामधल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतात तात्पुरत्या वास्तव्यासाठी आलेल्या परदेशी नागरिकांसाठी परराष्ट्र मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार ज्या नागरिकांना आपल्या व्हिसाची मुदत वाढवून हवी आहे, अथवा आपलं वास्तव्य नियमित करून हवं आहे, त्यांनी आपल्या जवळच्या प्रादेशिक परदेशी नागरिक नोंदणी कार्यालयाशी संपर्क साधावा. याठिकाणी त्यांना सहाय्य मिळेल  असं यात म्हटलं आहे.

<><><><><>

नागपूर जिल्ह्यात राऊळगाव इथं आज सकाळी एका कारखान्यात स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला, तर १८ जम जखमी झाले.  खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाल्याचं स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरु असून, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चं पथक मदतकार्य करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसाला राज्यशासनातर्फे  ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबाला  प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची  , तर  जखमींना प्रत्येकी ५०

हजार  रुपयांची मदत दिली जाईल  असं त्यांनी समाज मध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

विश्वचषकाच्या सुपर एट सामन्यात भारताचा सामना आज वेस्टइंडिज संघाविरुद्ध कोलकात्यातील ईडन गार्डन्स इथं होणार आहे. उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे. सायंकाळी सात वाजता सामना सुरु होईल. वेस्टइंडिज सध्या गुणतालिकेत सरस धावगतीच्या जोरावर दुसऱ्या स्थानावर आहे. उपांत्य लढती जिंकणाऱ्या संघांतील विश्वचषक विजेतेपदाची लढत येत्या आठ मार्चला रविवारी अहमदाबाद इथं नरेंद्र मोदी क्रीडासंकुलामध्ये होणार आहे.

**//<><><><><>//**